क्रमांक: १६१९६/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक: २३ नोव्हेंबर, २०२०.

**संदर्भ :-** या सचिवालयाचे ज्ञापन क्रमांक १४७१०/क-१, दिनांक २३ ऑक्टोबर, २०२०.

**:: परिपत्रक ::**

उपरोक्त संदर्भाधीन ज्ञापन क्रमांक १४७१०/क-१, दिनांक २३ ऑक्टोबर, २०२० अन्वये महाराष्ट्र विधानमंडळाच्या ग्रंथालय कक्षात उपलब्ध असलेल्या कार्यवृत्तांचे डिजिटलायझेशन करण्याकरिता विधानमंडळ सचिवालयाची प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee) (PIC) गठीत करण्यात आलेली आहे. सदरहू समितीची प्रारंभिक बैठक मंगळवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२० रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

उक्त बैठकीमध्ये प्रकल्प अंमलबजावणी समितीने विधानमंडळ सचिवालयातील विविध कक्षांमध्ये असणारी माहिती, महत्त्वाच्या नस्त्या व संदर्भासाठी आवश्यक असणारे साहित्य यांचाही डिजिटलायझेशन प्रकल्पात समावेश करण्यात यावा जेणेकरुन प्रत्येक कक्षाला त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती डिजिटलरुपात जतन करता येईल व आवश्यकतेनुसार त्या कक्षास व या सचिवालयातील इतर कक्षासही सहजतेने उपलब्ध होऊ शकेल, याप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

समितीच्या उपरोक्त निर्णयान्वये या सचिवालयातील सर्व कक्षांना सूचित करण्यात येते की, त्यांच्याकडे असणारी माहिती, महत्वाच्या नस्त्या व संदर्भासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची सविस्तर माहिती व अंदाजे पृष्ठ संख्या याची यादी तयार करावी तसेच डिजिटलायझेशनच्या माध्यमातून प्रत्येक कक्षाला कुठल्या प्रकारची माहिती कशाप्रकारे मिळणे अपेक्षित आहे याचाही उल्लेख सोबत करण्यात यावा. सदर माहिती (सॉफ्ट व हार्ड कॉपीमध्ये) 'प्रकल्प अंमलबजावणी समिती' यांच्याकडे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० पर्यंत पाठविण्याची व्यवस्था करावी.

**(जयवंत राणे)**
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

..२/-

**प्रति,**

या सचिवालयातील सर्व कक्ष.

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) समितीतील संबंधित अधिकारी/कर्मचारी.

६) निवडनस्ती.